# <u>कांदळवन निसर्ग पर्यटन</u>

थंडी सुरु होताच पर्यटकांची गर्दी अनेक निसर्गरम्य ठिकाणी होऊ लागते. नुकताच संपलेला पावसाळा, तजेलदार दिसणारी झाडे वातावरणाला मोहक बनवतात. महाबळेश्वर, गोवा, गणपतीपुळे , माथेरान , लोणावळा, इत्यादी पर्यटन क्षेत्र तुम्हाला माहितीचे असतील. पण तुम्हाला माहिती आहे का ? महाराष्ट्र राज्याला ७२० कि. मी. लांबीची किनार-पट्टी लाभलेली आहे आणि तुम्हाला सांगतांना आनंद होत आहे कि ह्या किनारपट्टी जवळ सुद्धा, तुम्हाला भरभरून पर्यटनाचा आनंद उपभोगता येईल. इथे वसलेल्या विविध निसर्ग समृद्ध गावात तुम्हाला एक वेगळाच आनंद अनुभवता येईल. हे नुसतेच पर्यटन नसून , स्थानिकांच्या सहभागातून राबवण्यात आलेले निसर्ग पर्यटन आहे. महाराष्ट्रा च्या रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्यांमध्ये प्रामुख्याने ह्याचा लाभ घेता येईल ज्याच्यात अनेक निरनिराळ्या गोष्टीचा जसे कांदळवन सफारी, बीच वॉल्क , बीच वर दिसणाऱ्या शंख, शिंपले, आणि इतर रंगीबेरंगी प्रजातीची ओळख, स्थलांतरित आणि स्थानिक निवासी पक्षांचे निरीक्षण, अश्या अनेक बाबींचा सहभाग असेल. या बरोबरच काही ठिकाणी कायाकिंग्, बेटावर कॅम्पिंगची सुविधापण लवकरच पर्यटकांसाठी खुल्या होणार आहेत. या बरोबरच त्या ठिकाणी असलेल्या जुन्या किल्ल्यांची माहिती, तिथली पारंपरिक मंदिरे सुद्धा बघता येतील. शिवाय अनेक स्थानिकानीं पर्यटकांच्या राहण्यासाठी घरगुती निवास स्थान उपलब्ध करून ठेवले आहे. ह्यामुळे गावामध्ये जाऊन छान निसर्गरम्य वातावरणात राहून, पारंपरिक जेवणाचा आनंद घेता येईल. शिवाय नक्षत्र व तारका समूह यांची ओळख, पारंपरिक मासे-मारी करण्याचा अनुभव सुद्धा इथे घेता येईल.

ह्या सगळ्या गोष्टी महाराष्ट्रात बघता येतील ह्याच तुम्हाला नक्कीच नवल वाटत असेल, पण कांदळवन आणि तिथली विविधता निराळ्या पद्धतीने जोपासणारे महाराष्ट्र हे भारताचे पहिलेच राज्य आहे. सगळ्यात पहिल्यांदा मुंबई हाइ - कोर्ट ने दिलेल्या आदेशानुसार राज्य शासनाने २००८ मध्ये कांदळवनांना **'संरक्षित वने'** म्हणून घोषित केले . एवढेच नाही तर पुढे २०१२ मध्ये वन खात्या अंतर्गत राज्यसरकारने स्वतंत्र कांदळवन कक्षाची निर्मिती केली , त्या नंतर २०१३ मध्ये कांदळवनांना **'राखीव वनांचा'** दर्जा दिला. अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक, कांदळवन कक्ष ह्यांना हा कक्ष सांभाळणे व वृद्धिंगत करण्याची कामगिरी सोपविली . पुढे कांदळवन कक्ष अंतर्गत कांदळवन प्रतिष्ठानची स्थापना झाली आणि कांदळवन अभ्यास, संशोधन, आणि त्यांच्या बद्दलची जागरुकता ह्याला नव्याने पंख फुटले. कांदळवन संवर्धनासाठी अनेक शाश्वत उपजीविका योजना स्थानिक मासे-मारी

करणाऱ्या लोकांसाठी योजिल्या आहेत ज्यामध्ये कांदळवनांचे महत्व लोकांना कळेल आणि त्या बद्दलची जागरुकता वाढेल.

**शाश्वत निसर्ग पर्यटन बद्दलची माहिती**

कांदळवन कक्ष आणि कांदळवन प्रातिष्ठान ह्यांनी किनाऱ्यावर असलेल्या १०४ गावांमध्ये कांदळवन सहव्यवस्थापन समिती तयार केल्या. राज्य सरकारने राबविलेल्या 'कांदळवन संरक्षण व उपजीविका निर्माण योजने' अंतर्गत या गावांना वैकल्पिक उपजीविकेसाठी खेकडे पालन, कालवे पालन, पिंजरे वापरून केलेले मत्स्य पालन, शोभिवंत मत्स्य पालन आणि कांदळवन निसर्ग पर्यटन साठी तिथल्या स्थानिकांना वरील उपक्रम राबवण्यासाठी विविध विषयांवर कार्यशाळा आयोजित केल्या जातात. आज अनेक भागांमध्ये स्थानिक लोकं निसर्गपर्यटन हे विकासाच्या दृष्टीने पाहू लागले आहेत. निसर्ग पर्यटन हे या स्थानिकांसाठी नुसतंच उपजिविकेचे साधन नाही तर कांदळवन असण्याचा आणि त्या परिसंस्थेचे महत्त्व पर्यटकांना पटवून देण्याचा साधन वाटू लागला आहे. ह्या मध्ये काही गावी जसे काळींजे, दिवेआगर, आंजर्ले, सोनगाव, तारामुंबरी, मिठमुंबरी, निवती आणि वेंगुर्ला मधले स्थानिक उत्फुर्तपणे सहभागी झाले आहेत. ह्या प्रत्येक गावामध्ये स्वयंसहायता गट बनवला जातो आणि नंतर त्यांचा सक्षमीकरण केले जाते.

निसर्ग पर्यटनासाठी कार्य-शाळेत कांदळवन प्रजाती कश्या ओळखाव्या आणि का जोपासावी ह्या बद्दल त्यांना सखोल माहिती दिली जाते. त्या नंतर त्यांना तिथल्या जैविविधतेची जसे पक्षी निरीक्षण, समुद्रकिनाऱ्यावर किंवा पाणथळ जमिनीवर असलेल्या छोट्या जीवांची माहिती, निसर्गपर्यटनाचे नियम, पर्यटकांशी संवाद साधण्याच्या पद्धती, येणाऱ्या पर्यटकांचे अतिथ्य कसे करावे ह्या सर्व बाबींवर कार्यशाळा आयोजित केल्या जातात. तसेच प्रत्येक गावात एक किंवा दोन प्रकल्प सहायकाही नेमणूक केलीली आहे, जे ह्या लोकं साबोत राहून त्यांना कार्य-शाळेत शिकलेल्या सर्व माहितीचा सराव स्थानिकांकडून करून घेतात. वर सांगितलेल्या योजनेअंतर्गत महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांमध्ये जसे रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग इथल्या काही गावांमध्ये या निसर्ग पर्यटनाची सुरुवात झाली आहे.

तसेच , कांदळवन प्रतिष्ठान तर्फे गावकरी, प्रतिष्ठानचे कर्मचारी, शासकीय कर्मचारी, यांच्यासाठी क्षमता बांधणी उपक्रम देखील चालवले जातात. महाराष्ट्रातल्या सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे आणि पालघर या किनारपट्टीवरील जिल्हयांमध्ये प्रतिष्ठानचे शाश्वत उपजीविका उपक्रम सुरु असून या ठिकाणीच क्षमता बांधणी उपक्रमही 2017 पासून सूरू आहेत.

2018-19 व 2019-20 आर्थिक वर्षांत खालील उपजीविका उपक्रमांसाठी क्षमताबांधणी कार्यक्रम घेण्यात आहे आहेत.

- खेकडा पालन
- पिंजऱ्यातील मत्स्यशेती
- कालवे / शिंपले पालन
- शोभिवंत मत्स्यपालन
- शाश्वत निसर्ग पर्यटन मार्गदर्शन
- बोटिंग करीता प्राण वाचविण्याचे प्रशिक्षण
- नक्षत्र व तारका-समूह यांची ओळख
- मत्स्यव्यवसाय मूल्यवर्धन
- श्री पद्धतीची भातशेती (System of Rice Intensification)

यातील खेकडा पालन, कालवे / शिंपले पालन, पिंजऱ्यातील मत्स्यशेती पर्यटन हे या उपजीविका सिंधुदुर्ग मध्ये रुढ आहेत. त्यामुळे इतर जिल्हयांतील गावकऱ्यांना त्या पाहण्यासाठी व शिकण्यासाठी सिंधुदुर्गात आणण्यात येते. महाराष्ट्राच्या जिल्हयांतील 163 गावकरी आतापर्यंत सिंधुदुर्गाला भेट देउन गेले आहेत.

## रायगड इथले निसर्ग पर्यटन प्रकल्प

शिवाजी महाराजांच्या काळापासून रायगड हा विविध किल्ल्यांसाठी प्रसिद्ध आहे. रायगडात एखादा पर्यटक एकतर हे किल्ले बघायला, किंवा श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगर सारख्या ठिकाणी असलेल्या ऐतिहासिक स्थळे पाहण्यासाठी किंवा तिथल्या मंदिरांचे दर्शन घेण्यासाठी जातात. ह्या बरोबरच आता दिवेआगार आणि काळींजे येथील स्थानिक तुम्हाला कांदळवनांची आणि तिथल्या जीव संपदेची नव्याने ओळख करून देतील आणि पाहुणचार देखील करतील . कांदळवनातील जैवविविधता लक्षात घेता निसर्गाच्या संवर्धनाबरोबर स्थानिकांना रोजगार मिळण्यासाठी शाश्वत निसर्ग पर्यटनाला सुरुवात करण्यात आली आहे.या सगळ्या प्रकारात स्थानिक आणि तिथे येणारे पर्यटक हे दोघेही निसर्गाशी जोडले जात आहेत असा म्हणायला हरकत नाही

**काळिंजे :** काळिंजे हे रायगड जिल्हयातील श्रीवर्धन तालुक्यातील एक गाव आहे. काळिंजे गाव हे मुंबईपासून 193 कि.मी. अंतरावर असून नजीकचे रेल्वे स्थानक माणगाव 55 कि.मी., श्रीवर्धन 14 कि.मी. तसेच दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेले हरिहरेश्वर फक्त 5 कि.मी. अंतरावर आहे. काळिंजे गावाला भव्य असे 190 हे.

कांदळवन लाभले असून, यामध्ये कांदळवनाच्या 11 प्रमुख प्रजाती तसेच 05 संलग्न प्रजाती आढळून येतात. काळिंजे खाडीच्या मध्यभागी असलेल्या बेटा भोवती कांदळवनाचे दाट अच्छादन आहे. बेटावर जुनी वस्ती, गुरांचे गोठे, आंबा-बोरांची झाडे, नारळ व सुपारीच्या बागा आहेत. बेटावर वटवाघळांची वस्ती तसेच रानडुक्कर व कोल्हा यासारख्या प्राण्यांचा अधिवास आहे. महत्वाचे म्हणजे चारही बाजूंनी खाऱ्यापाण्याने वेढलेल्या बेटाच्या मध्यभागी गोड्या पाण्याच्या विहिरी आहेत. बेटाला लागुनच कांदळवन रोपवाटिका अणि वाळूची पुळन आहे. येथे पुळणीवर असलेल्या कांदळवनाची लांबच-लाब पसरलेली मुळे येथील विषेश आकर्षण आहे.

काळिंजे खाडीतील कांदळवन हे उदमांजराचे (पाणमांजराचे) हक्काचे घर आहे. खाडीमध्ये होडीतून प्रवासादरम्यान पहाटे तसेच संध्याकाळी उदमांजरांना समूहाने माशांची शिकार करताना अनेकदा पाहिले गेले आहे. कांदळवना बरोबरच काळिंजे गावाला गर्द डोंगर व वनांचे सौंदर्य लाभले असून पक्ष्यांच्या सुमारे 85 हून अधिक प्रजातींची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये लिफ बर्ड (पर्ण पक्षी), इंडियन पॅराडाईज फ्लाय कॅचर (स्वर्गीय नर्तक), पाईड हॉर्नबील (धनेश), ब्लॅक कॅप किंगफिशर (काळ्या टोपीचा धीवर) यासारख्या पक्ष्यांच्या समावेश आहे.

कांदळवन निसर्ग पर्यटनामुळे काळिंजे गावातील लोकांचा कांदळवना बद्दलचा दृष्टिकोन बदलला असून, निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरता स्थानिक जनता सज्ज झाली असून, यातून त्यांना उपजिविकेचे साधन सुद्धा उपलब्ध होत आहे. यामूळे गावातील तरुणांचे शहराकडे होणारे व झालेले स्थलांतर थांबून गावातच रोजगार निर्मिती झाली आहे.

कांदळवन निसर्ग पर्यटन काळिंजे मधील उपक्रमा-मध्ये पर्यटकांना मॅंग्रोव्ह बोट सफारी, मॅंग्रोव्ह ट्रेल, कांदळवन रोपवाटिकेला भेट, जंगलातील व बेटावरील पक्षी निरिक्षण, पारंपारिक मासे-मारी व अँगलिंग, पंचक्रोशीतील आकर्षक स्थळांना भेट तसेच महाराष्ट्रात प्रथमच सुरु होणाऱ्या मॅंग्रोव्ह कयाकिंगचा देखील आनंद घेता येत आहे. विशेष म्हणजे काळिंजे निसर्ग पर्यटनाचे काम येथील स्थानिक लोक पाहत असून महिलांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यासाठी त्यांना कांदळवनाच्या प्रजाती, कांदळवन जैवविविधता, कांदळवन व जंगलातील पक्षी निरिक्षण, कयाक चालविणे तसेच लाईफ सेविंगचे प्रशिक्षण देण्यात आले असून ग्रामस्थच पर्यटकांचे मार्गदर्शक होणार आहेत. कांदळवन निसर्ग पर्यटन काळिंजे मधील संपूर्ण उपक्रमांचा आनंद पर्यटकांना गावातच राहून घेता यावा यासाठी होमस्टेची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. गर्द हिरव्या कांदळवनालगत वाहणारी खाडी, मैत्रीपूर्ण स्थानिक आदरातिथ्य व समृद्ध अशी जैवविविधता पर्यटकांसाठी एक उत्तम पर्यटन स्थळ आहे.

कांदळवन निसर्ग पर्यटन काळिंजे सुरु झाल्या पासून या ठिकाणी आतापर्यंत 140 पर्यटकांनी भेट दिली असून, त्यांचा सकारात्मक प्रतिसाद पाहता निसर्ग प्रेमीं कडून मोठ्या प्रमाणात कांदळवन निसर्ग पर्यटन काळिंजेला भेट देण्या संधर्भात विचारणा करण्यात आली आहे. मोठ्या संख्येने किंवा गटाने येणाऱ्या पर्यटकांसाठी विशेष सवलत सुद्धा देण्यात येत आहे.

**दिवेआगर :** रायगड जिल्हयातील दिघीच्या खाडी पासून जवळच असलेलं नयनरम्य गाव म्हणजे दिवेआगर. दिवेआगर  तसे पर्यटकांसाठी आधीपासूनच परिचयाचे आहे. इथला ५ किलोमीटरचा सपाट समुद्रकिनारा आणि किनाऱ्यावर असलेली केवडा (केतकी) ची वने  त्याच्या सौंदर्यात भर घालतात.

या किनाऱ्यावर असंख्य जीव जसे खेकडे शंख शिंपले सापडतात. हा किनारा आहे ऑलिव्ह रिडली कासवाचे विणी चे जागा म्हणून ओळखला जातो. येथेही ही त्यांच्या अंड्याचे संरक्षण आणि आणि संवर्धन केले जाते. गावात छोटा कोळीवाडा आहे. सुंदर अशी एक खाडी असून तिथे दोन्ही बाजूला कांदळवन आहे. तिथले प्राणी पक्षी यांचे जग वेगळेच आहे.

गावाच्या जरा बाहेरच्या बाजूला खाडीवर पाणी अडवण्यास उघड्या झडपा आहेत. खाडीच्या एका भागात कांदळवन तर दुसऱ्या शेवटच्या भागात वाळूचे गवताळ मैदान आहेत जिथे थंडीच्या काळात विविध पक्षी येतात. समुद्राचा आनंद घ्यायला येणारे प्रवासी येथील पक्षी सौंदर्यही बघतात.

या शिवाय, हे गाव बागायती असून नारळ, सुपारी, आंबा ही इथली मुख्य पिके आहेत. शेतामध्ये भात पीक होते व वाल, पावटा इत्यादी देखील येथे उगवले जाते. या गावाला वेगळी ओळख मिळाली ती म्हणजे सोन्याच्या गणपतीमुळे . तर मग दिवेआगरला गेलात तर कांदळवनांची भेट देणार ना?

## रत्नागिरी  इथले निसर्ग पर्यटन प्रकल्प

रत्नागिरी मध्ये आंजर्ले आणि सोनगाव ह्या दोन गावांमध्ये ह्या शाश्वत निसर्गपर्यटनाचा अनुभव पर्यटक घेऊ  शकतो. तुम्हाला कासव महोत्सव अनुभवायचा असेल तर आवर्जून आंजर्ले गावाला भेट द्या आणि मोठमोठाल्या मगरी बघायच्या असतील तर सोनगाव ला भेट द्या.

**आंजर्ले :** आंजर्ले हे दापोली तालुक्यातील सुंदर समुद्रकिनारा असलेलं गाव जे जोग नदीच्या तोंडाजवळ वसलेला आहे. आंजर्ले मुख्यतः खडकावरच्या गणपती मुळे प्रसिद्ध आहे. गावाला एका बाजूने डोंगर तर दुसरीकडे अप्रतिम समुद्र किनारा आहे. डोंगर भागात वेगवेगळे जीव राहतात जसे ससे, कोल्हे, रान डुक्कर, सालजीव, काळ मांजर असे अनेक प्राणी बघायला मिळतात. या गावात वेगवेगळे पक्षी सुद्धा आढळतात विशेष म्हणजे पावसाळ्यात दुर्मिळ असा ODFK (Oriental dwarf kingfisher) किंगफिशर, इतर प्रकारचे खंड्या, हॉर्नबिल, समुद्रावर साम्राज्य असलेले समुद्र गरुड आणि इथल्या वाळूवर नोव्हेंबर ते मार्च दरम्यान समुद्री कासव अंडी घालण्यास येतात. समुद्री कासव यातील सगळ्यात लहान प्रजाती म्हणजे ऑलिव्ह रिडली जातीचे कासव अंडी घालण्यास येते. गावकऱ्यांनी या कासवासाठी हा किनारा राखून ठेवण्याचे ठरवले आहे. त्यामुळे पूर्वी चालत असलेल्या गाड्या आता किनाऱ्यावर शिरू देत नाहीत. सन २००४- २००५ पासून या किनाऱ्यावर सह्याद्री निसर्ग मित्र (SNM )चिपळुन या संस्थेने संरक्षण व संवर्धन मोहीम सुरू केली हे आजवर सुरेख पद्धतीने सुरू आहे. गेली पाच वर्ष ग्रामपंचायत वन विभाग SNM मिळून कासव महोत्सव साजरा करीत आहेत यामध्ये सागरी कासवाच्या अंड्यामधून येणारी पिल्ले सुरक्षित पणे समुद्राकडे रवाना केली जातात. राज्यातूनच नव्हे तर देशातून परदेशातून हा सोहळा पहायला पर्यटक येतात.स्थानिक लोक आपल्याच घरात त्यांची राहण्याची जेवण्याची सोय करतात असे सुमारे 25 होमस्टे आहेत गावात काही हॉटेल सुद्धा आहेत.त्यामुळे इथे येणाऱ्या पर्यटकांची उत्तम सोय होऊ शकते.

## सिंधुदुर्ग इथले निसर्ग पर्यटनाही यशस्वी गाथा

महाराष्ट्र शासनाने १९९७ साली पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केल्याने सिंधुदुर्गात बहुतांशी पर्यटक हे मालवण पाण्यामधील सिंधुदुर्ग किल्ला, तारकर्ली, देवबाग, शिरोडा देवगड येथील समुद्रकिनारे व काही प्रसिद्ध मंदिरे यासाठी येतात. ह्या ठिकाणी रमणीय सागर किनारे उंच माडाच्या बागा, आंबा, फणस, काजू, कोकम, लालमाती , सुंदर मंदिरे रुचकर मत्स्य आहार आणि बरच काही बघता येतं. अशा जैवविविधतेने समृद्ध भूमीत वनविभागाच्या २०१२ मध्ये नव्याने स्थापन झालेल्या कांदळवन कक्षाने, UNDP म्हणजेच संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम यांच्या प्रकल्पाच्या माध्यमातून आपली पाळेमुळे रोवली. २०१२ ते २०१७ दरम्यान देवगड मालवण व वेंगुर्ला तालुक्यांमध्ये या प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे क्षेत्र होते.सागरी तटाची जैवविविधता अबाधित रहावी व त्यासाठी शाश्वत रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट होते.

सिंधुदुर्गातील वेंगुर्ला येथे मांडवी खाडीतील **'स्वामिनी महिला बचत गटाच्या मांडवी इको-टुरिझम'** हा कांदळवन निसर्ग पर्यटनाचा पहिला प्रकल्प आहे ज्याला भरभरून यश मिळाले. स्वामिनी च्या अध्यक्षा सौ स्वेता गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली गावीत सामाजातील मासे विक्री जाणाऱ्या आठ महिलांनी पर्यटनात काहीतरी करायचे या हेतूने एकत्र येऊन बचत गटाची स्थापना केली. कांदळवन कक्षाच्या United Nations Development Programme (UNDP) प्रकल्पाची माहिती मिळताच कांदळवन सफारीची इच्छा व्यक्त केली. कांदळवन कक्षाचे पदाधिकारी व UNDP प्रकल्पाचे तज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली एका आगळ्यावेगळ्या उपक्रमाची सुरुवात मांडवी खाडीत झाली.सुरुवातीला अनेक वर्षे तिवर, चिप्पी नावाने ओळखल्या जाणाऱ्या कांदळवन यांच्या मांडवी खाडीत आठ वेगवेगळ्या जाती आहेत, हे ऐकून या सर्वजणी थक्क राहिल्या. विविध विषयांवरील प्रशिक्षणानंतर या सर्व महिला बोटीची वले व सुकाणू सांभाळत भारतातील पहिला महिला कांदळवन प्रकल्प अत्यंत उत्साही पूर्ण राबवत आहे. कांदळवन बाबत जनजागृती व पर्यावरण पूरक माहिती देत या सर्व महिला बोट चालविण्यात कुठेही कमी पडत नाहीत. मांडवी खाडीतील आठ प्रजाती,त्यांची शास्त्रीय नावे, पक्ष्यांची इंग्लिश नावे, उद मांजरे (otters) , खेकडे, कालवे इत्यादी जैवविविधतेची माहिती या सफारीच्या माध्यमातून ह्या महिला देतात कांदळवनांचे महत्व त्यांचे उपयोग व त्यांना असणारे मानव निर्मित धोके याची माहिती देखील या महिला उत्साहाने सांगतात. कांदळवन सफारी पक्षी निरीक्षणानंतर पर्यटकांसाठी रुचकर मेजवानी ची व्यवस्था देखील बचत गटामार्फत केली जाते. एकंदरीत पारंपारिक पर्यटन व्यवसायाला बळ देऊन काहीतरी वेगळे व पर्यावरण पूरक करणाऱ्या या प्रयत्नाला शासनाची जोड व महिलांची जिद्द, यामुळे एक वेगळेच वळण मिळाले आहे.स्वच्छ भारत स्पर्धेत आघाडीवर असणाऱ्या वेंगुर्ला शहरात नगर परिषदेचे देखील या प्रकल्पासाठी मोलाचे योगदान आहे. या महिलांच्या बचत गटाला (स्वामिनी गटाला )त्यांच्या या कामगिरीबद्दल विविध पुरस्कार देखील मिळाले आहेत.

याच महिलांचा आदर्श पुढे ठेवून सिंधुदुर्गातील तारामुंबरी, मिठमुंबरी,मोठा निवती आणि आचारा येथील बचत गटांनी देखील कांदळवन कक्षाकडे मार्गदर्शनाची मागणी केली आहे. तारामुंबरी येथील जलकन्या बचत गटामार्फत कालवे पालन, खेकडा पालन, हे प्रकल्प राबविले जात असून आता कांदळवन निसर्ग पर्यटन लवकरच सुरु करून तारामुंबरी चे नाव पुढे आणण्याचा ध्यास स्थानिकांनी घेतला आहे. मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहाय्याने शोभिवंत माशांचे मत्स्यालय येथे उभारण्यात आले असून बचत गटामार्फत कांदळवन नर्सरी व शोभिवंत मत्स्यपालन देखील केले जाते. कांदळवन कक्षाच्या या उपक्रमांद्वारे पर्यावरण संवर्धनास सोबतच महिलांचे समस्या सक्षमीकरण होत आहे यात शंकाच नाही

कांदळवन निसर्ग पर्यटन ह्या विविध जिल्यातील गावकऱ्यांना मिळणार्या रोजगारा सोबतच कांदळवना बद्दलची जनजागृती व संवर्धनाचे बीज सामान्यांच्या मनात रुजविण्याचे थोर काम करण्यात येत आहे. लोकांचा प्रतिसाद बघता येत्या काळात ही गावं कांदळवन निसर्ग पर्यटनाचा नवा चेहरा होतील हे मात्र नक्की.

कांदळवन निसर्ग पर्यटन भेट देण्यासाठी तसेच अधिक महितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
कांदळवन प्रतिष्ठान : ०२२-२२६९४९८४/ ८५
ई-मेल : ad.ecotourism.mfn@gmail.com

Article by

Shri Virendra Tiwari
Additional Principal Chief Conservator of Forests, Mangrove Cell, Mumbai & Executive Director, Mangrove Foundation

With inputs from Mangrove Foundation Team
- Dr Sheetal Pachpande - Assistant Director - Projects
- Mr Vandan Jhaveri - Assistant Director - Ecotourism
- Mr Siddhesh Surve - Assistant Director - Capacity Building
- Ms Durga Thingale & Mr Rohit Sawant - Biodiversity & Livelihood Specialist, Sindhudurg
- Mr Mohan Upadhye - Research Assistant
- Mr Abhinay Kelaskar - Livelihood Assistant, Ratnagiri
- Mr Sandesh Ambhore - Project Associate, Raigad